दिनांक : . .२०१९

प्रति,
मा. मुख्यमंत्री,
कर्नाटक राज्य.

**विषय : कर्नाटक राज्यात पुन्हा 'गोहत्या बंदी कायदा' लागू करण्याविषयी...**

वर्ष २०१० मध्ये तत्कालीन भाजप शासनाने कर्नाटक राज्यात 'कर्नाटक गोहत्या प्रतिबंधक आणि संरक्षण अधिनियम २०१२' (**Karnataka Prevention of Cow Slaughter and Preservation (Amendment) Act,** २०१०) हा कायदा केला होता. वर्ष २०१४ मध्ये काँग्रेसशासित सरकारने सत्तेत आल्यावर अल्पसंख्यांकांच्या लांगूलचालनासाठी तो कायदा रद्दबातल केला. आता पुन्हा सुदैवाने भाजप शासन पुन्हा सत्तेत आले आहे. तरी नूतन कर्नाटक शासनाने राज्यात पुन्हा गोहत्या बंदी कायदा लागू करावा आणि गोमांसाच्या विक्री अन् वाहतूक यांवर कडक निर्बंध आणावेत, अशी आमची मागणी आहे.

*** या अनुषंगाने काही सूत्रे आम्ही आपल्या निदर्शनास आणून देत आहोत....**

१. हिंदु धर्मांत गायीला 'गोमाता', 'विश्वमाता' म्हणून स्थान देण्यात आले आहे. गायीचे पावित्र्य इतके आहे की तिच्या शरीरात ३३ कोटी देवता वास करतात, अशी हिंदु धर्मियांची श्रद्धा आहे. त्यामुळे गायीचे शेष आणि मूत्र यांचा वापर धार्मिक कृतींच्या वेळी, तसेच अन्य वेळी शुद्धता आणि पावित्र्य जपण्यासाठी केला जातो. हिंदु समाज गायीची मोठ्या भक्तीभावाने पूजा करतो. तसेच हिंदु धर्मशास्त्रांनुसार 'गोहत्या' हे महापाप मानले गेले असून तसे करणाऱ्याला 'ब्रह्महत्ये'चे महापातक लागते. इतकेच नव्हे, तर गोहत्येत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्यालाही ते महापाप लागते. याउलट एखाद्या व्यक्तीकडून अक्षम्य अपराध आणि पापकर्मे झाली असल्यास अन् अशा व्यक्तीने जर श्रद्धा ठेवून मनोभावे गोमातेची सेवा केली, तर तो त्या पापांतून मुक्त होतो, असेही हिंदु धर्मशास्त्र सांगते. त्यामुळे हिंदु समाज गोहत्या कधीही सहन करू शकत नाही.

२. प्रभु श्रीरामचंद्रांचे पूर्वज राजा दिलीप यांनी गायीला वाचवण्यासाठी स्वतःचे प्राण पणाला लावले होते. भगवान श्रीविष्णुंनी 'कृष्णावतारा'त गोपालन आणि गोरक्षण करून गोसेवेचा आदर्श जगासमोर ठेवला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनीही बालवयात गोहत्या करणाऱ्या धर्मांध कसायांना कठोर शिक्षा करून गोमातेप्रती असलेले कर्तव्य बजावले होते.

३. देशात होणाऱ्या गोवंशांच्या हत्येविषयीच्या खटल्यात (सिव्हिल अपील : ४९३७-४९४० of १९९८) दिनांक २६ ऑक्टोबर २००५ यादिवशी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायमूर्तींच्या घटना खंडपिठाने गोहत्या रोखण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला होता. गोहत्या रोखण्याचे दायित्व प्रत्येक राज्य सरकार, मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांचे असल्याचे त्यात म्हटले आहे.

४. इस्लाममधील 'कुराण', 'हदीस' वा अन्य कोणत्याही धार्मिक ग्रंथात 'गोहत्या करा' वा 'गोहत्या हा मुसलमानांचा धार्मिक अधिकार आहे', असे कोठेही म्हटलेले नाही. तसेच हिंदूंना गोमाता पूज्य असल्याचे धर्मांध कट्टरतावादी जाणतात, तरीही ते जाणीवपूर्वक गोमातेची हत्या करतात. यातून त्यांचा हिंदूंच्या धार्मिक भावना हेतूतः दुखावण्याचा हेतू स्पष्ट होतो. परिणामी देशात धार्मिक तणाव निर्माण होऊन सामाजिक आणि धार्मिक सलोखा बिघडत आहे, सामाजिक अशांतता निर्माण होत आहे.

५. वर्ष १९४७ मध्ये ९० कोटी असलेले देशी गोधन आता अवघे २-३ कोटी उरले आहे. आज देशातील २९ राज्यांपैकी २० राज्यांमध्ये (महाराष्ट्र, गुजरात, हरियाणा, राजस्थान, मध्यप्रदेश व अन्य राज्यांत) गोहत्येच्या

विरोधात कायदे करण्यात आलेले आहे; मात्र 'गोहत्या बंदी'साठी केलेल्या कायद्यांत शिक्षेसाठी कठोर तरतूद नसल्याने बहुतांश प्रकरणांतील आरोपी तात्काळ जामिनावर मुक्त होतात आणि पुढेही अशाच कायदाबाह्य कृती पुन्हा चालू ठेवतात. अनेक ठिकाणी पशुवधगृहे (कत्तलखाने) आणि वाहने यांवर पोलीस अन् गोरक्षक यांनी घातलेल्या धाडींमध्ये मोठ्या प्रमाणात गोमांस जप्त केले जाते

६. सध्या कर्नाटकात गोहत्या बंदी कायदा लागू नसल्यामुळे राज्यभरात ठिकठिकाणी गोहत्या केली जात आहे. इतकेच नव्हे, तर गोरक्षणासाठी कार्य करणारे प्रशांत पुजारी, शिव उप्पर यांसारख्या अनेक गोरक्षक हिंदू कार्यकर्त्यांची हत्या धर्मांधाकडून करण्यात आलेल्या आहेत.

७. सध्या गोमांसाची वाहतूक करणारे वाहन चालक-मालक यांच्यावरही कठोर कारवाई होत नाही. पोलीस, प्रशासन आणि गोतस्कर यांच्यातील आर्थिक हितसंबंध असल्यानेही नियम अन् कायदे यांचा परिणामकारक वापर होत नाही.

८. कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपने सत्तेत आल्यास गोहत्या बंदी कायदा पुन्हा लागू केला जाईल, असे आश्वासन भाजपने दिले होते.

**※ आम्ही आपल्याकडे पुढील मागण्या करत आहोत....**

१. भाजप शासनाने वर्ष २०१२ मध्ये लागू केलेला गोहत्या बंदी कायदा पुन्हा तात्काळ लागू करावा. गोमांसाच्या विक्री अन् वाहतूक यांवर कडक निर्बंध आणावेत, तसेच संबंधित कायद्यातील त्रुटी दूर करून तो गुजरात राज्याच्या धर्तीवर अत्यंत कठोर करण्यात यावा.

२. गोतस्करांना रोखणाऱ्या हिंदु कार्यकर्त्यांना सुरक्षा पुरवण्यात यावी, हिंदु कार्यकर्त्यांवर झालेल्या आक्रमणांच्या प्रकरणी संबंधित गोतस्करांवर कठोर कारवाई करावी.

३. गोसंवर्धनासाठी शासनाने गायीपासून निर्माण होणाऱ्या गोमूत्र, शेष, पंचगव्य आदी वस्तूंना, तसेच गो-चिकित्सेला प्रोत्साहन द्यावे. त्यासाठी विशेष योजना राबवाव्यात आणि स्वतंत्र गो-मंत्रालय निर्माण करावे.

आपला नम्र,

**संपर्क क्र.:**